जा.क्र.वि.शा./राजकीय/ २५२ /२०२०
विशेष शाखा, पिंपरी चिंचवड
दिनांक :- ११/०१/२०२१

**विषय** :- **फौजदारी दंड प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे**
मतदान केंद्राचे १०० मीटरचे परिक्षेत्रातील व्यावसायिक दुकाने व आस्थापना वंद ठेवणेबावत आदेश.

**आदेश**

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग, पत्र क्रमांक रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.०१/का-८ दिनांक ११/१२/२०२० रोजीच्या प्रसिध्दीप्रत्रकान्वये माहे एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधीत मुदत संपणा-या तसेच नव्याने स्थापित एकुण १४,२३४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता संगणकीकृत पध्दतीने राबविण्यात यावयाचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यामध्ये पुणे जिल्हयातील ७४७ ग्रामपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम जाहिर झाला आहे. आचारसंहिता दिनांक ११/१२/२०२० रोजीपासून सुरु होवून दिनांक २१/०१/२०२१ रोजीपर्यंत अस्तित्वात राहील. दिनांक १५/०१/२०२१ रोजी मतदान होणार असून, दिनांक १८/०१/२०२१ रोजी मतमोजणी होणार आहे. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात चाकण पोलीस स्टेशन (२५ मतदान केंद्र ६२बुथ), महाळुंगे पोलीस चौकी (०९ मतदान केंद्र २१ बुथ), आळंदी पोलीस स्टेशन (११ मतदान केंद्र २७ बुथ), हिंजवडी पोलीस स्टेशन (११ मतदान केंद्र ५४ बुथ), शिरगाव पोलीस चौकी (०६ मतदान केंद्र १८ बुथ) व तळेगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन (०२ मतदान केंद्र ०३ बुथ) हद्दीतील ग्रामपंचायतींचे एकुण ६४ मतदान केंद्रे (इमारती) व १८५ बुथचा समावेश आहे.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात एकुण ६४ मतदान केंद्रे (इमारती) व १८५ बुथवर मतदान होणार आहे. मतदान सुरळीत व शांततेत पार पडण्यासाठी, सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये व सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी सदर मतदान केंद्रांचे परिघापासून १०० मीटर सभोवतालच्या परिसराच्या जागेचा प्रचारासाठी व इतर कारणांसाठी गैरवापर होण्याची दाट शक्यता असल्याने एकूण ६४ मतदान केंद्रांचे (इमारती) १०० मिटर परिसरात निर्बंध घालणे आवश्यक आहे. अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी कृष्ण प्रकाश, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड या आदेशान्वये फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक - २०२० अनुषंगाने एकुण ६४ मतदान केंद्रांचे (इमारतींच्या) परिघापासून १०० मीटर सभोवतालच्या परिसरामध्ये दिनांक १५/०१/२०२१ रोजी ००.०१ वा. पासून ते मतदान प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

१) ग्रामपंचायत सार्वत्रिक निडणुक - २०२० अनुषंगाने एकुण ६४ मतदान केंद्राच्या (इमारतींच्या) परिघापासुन १०० मीटर सभोवतालच्या परिसराचे आतील सर्व व्यावसायिक, व्यावसायिक दुकाने, रेस्टॉरन्ट, टप-या, वाणिज्यिक आस्थापना (अत्यावश्यक सेवा वगळून) सर्व आस्थापना व तत्सम बाबी बंद ठेवाव्यात.
२) मतदान केंद्र व परिसरातील भागात कोणत्याही प्रकारची हत्यारे, अग्निशस्त्रे जवळ बाळगता येणार नाहीत. सदरचा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावित असलेल्या शासकीय कर्मचा-यांना (पोलीस दल, संरक्षण दल, तुरुंग विभाग, बॅक सुरक्षा विभाग व इतर केंद्रीय तसेच राज्य शासनाच्या अधिकारी व कर्मचारी यांना ) लागू राहणार नाही.

३) मतदान केंद्र व परिसरात मोबाईल फोन, टॅबलेट्स, लॅपटॉप वापरण्यास अगर घेवून येण्यास मनाई करण्यात येत आहे. (कर्तव्यावर असणा-या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना हा आदेश लागू राहणार नाही. )

सदरच्या आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.सं.कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे स्वाक्षरी व शिक्कयानिशी आज दिनांक ११ /०१/२०२१ रोजी देणेत आला आहे.

(कृष्ण प्रकाश)
पोलीस आयुक्त
पिंपरी चिंचवड

पोलीस आयुक्त
सत्यमेव जयते
पिंपरी चिंचवड

ठिकाण :- पिंपरी चिंचवड
दिनांक :-११/०१/२०२१